**नि.फौ.ख.नं.३५५/२०२५**

**नि.क्र. ४६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार – २**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,**
नाव – सुनिता मारुती उघडे,
वय–३५ वर्षे, धंदा – शेती,
राहणार– राक्षसवाडी बुद्रुक, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

**साक्षीदार क्र.२ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांचेतर्फे शपथेवर सुरु –**

१. घटना दि.२२/०८/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० च्या सुमारास घडली होती. त्यादिवशी माझे पती शेतात गेले होते. त्यादिवशी तुकाराम उघडे यांची मेंढरे आमच्या कांद्याच्या व मिरचीच्या पिकात चरत होती. त्यावेळी माझ्या पतीने शेतातील त्यांची मेंढरे बाहेर हुसकावून लावली असे मला घरी आल्यानंतर सांगितले. त्यानंतर माझा पती माझ्या थोरल्या दिराला शेतात मेंढरे का सोडले हे विचारण्यासाठी गेले. त्यावेळी तुकाराम उघडे, संदिप तुकाराम उघडे, अजय तुकाराम उघडे व अरुणाबाई तुकाराम उघडे यांनी माझ्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. अजय तुकाराम उघडे याने माझ्या पतीच्या छातीवर विट फेकून मारली. सदर विट माझ्या पतीला लागल्यानंतर ते खाली कोसळले. मी व माझा मुलगा वैभव माझ्या पतीला तेथून घरी घेऊन गेलो. त्यानंतर एक–दोन दिवसांनी माझ्या पतीच्या छातीत दुखु लागले. त्यामुळे माझ्या पतीला बारामती येथील डॉ. गायकवाड यांच्या दवाखान्यात सिटी स्कॅन करण्यासाठी नेले. सिटी स्कॅन केले असता माझ्या पतीच्या दोन–तिन बरगड्यांना फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले. सदर घटनेबाबत माझ्या पतीने पोलीस ठाणे, कर्जत येथे जाऊन तक्रार दिली.

२. मी आरोपींना ओळखते. आज रोजी आरोपींपैकी आरोपी अजय तुकाराम उघडे न्यायालयात हजर असून अन्य आरोपी न्यायालयात हजर नाहीत.

(आरोपी क्र.१, २ व ४ न्यायालयात गैरहजर असून त्यांच्यावतीने **नि.क्र.४५** लगत अर्ज देऊन त्यांच्या गैरहजेरीत पुरावा नोंदविण्यास हरकत नाही असे कथन करण्यात आल्याने त्यांची आजरोजीची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे.)

३. माझ्या पतीला ज्या विटेने मारहाण केली ती विट मला दाखविल्यास मी ओळखू शकेन. (प्रस्तुत खटलयातील जप्त वीट आर्टिकल अ साक्षीदारास दाखविण्यात आले.) आता मला दाखविलेला विटेचा तुकडा माझ्या पतीला फेकून मारलेला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत सदर साक्षीदारचा उलटतपास सुरु.</u>**

४. दोन–तिन दिवसांनी माझ्या पतीच्या छातीत दुखू लागले हा मजकुर मी पोलीसांना जबाब देताना सांगितला होता. आता मला माझा जबाब दाखविला. त्यात दुसऱ्या दिवशी असे लिहिलेले आहे. घटनेच्या दिवशी मी माझ्या पतीला आम्ही गावातीलच खाजगी दवाखान्यात उपचारासाठी नेले होते. घटनेच्या दिवशी माझा पती अथवा आम्ही कुणीही पोलीस स्टेशनला आलो नव्हतो. आम्ही घटनेच्या दिवशी सरकारी दवाखान्यात गेलो होतो. आम्ही स्वतःहून सरकारी दवाखान्यात गेलो होतो. सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी केवळ माझ्या पतीच्या शरीराच्या बाहेरील भागाची तपासणी करुन काही झाले नसल्याचे सांगितले. माझ्या पतीला आम्ही अहमदनगर येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेले होते. माझ्या पतीला सरकारी दवाखाना अहमदनगर येथे उपचारासाठी नेलयाची कागदपत्रे मी स्वतः पोलीसांना दिलेली नाहीत. आम्ही माझ्या पतीला तेथे तपासल्यानंतर लगेच परत आलो होतो.

५. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही श्रीरामवस्ती येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, तेथे आमच्या घरांव्यतिरीक्त त्याठिकाणी श्रीराम आडनावाच्या लोकांची घरे आहेत. श्रीराम आडनावाची त्याठिकाणी ७–८ घरे आहेत. आमच्या वस्तीवर जवळपास ५० घरे असतील. आमच्या राहत्या घरापासून १०–१५ फुट अंतराव २०–२५ घरे आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीच्या दुखापतीस कुणीही कारणीभुत नाही असे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. घटनेच्यावेळी त्याठिकाणी २०–२५ लोक जमा झाले होते. त्याठिकाणी किसन उघडे, छाया उघडे, रंजना लांभोर, दत्तात्रय लांभोर, गणेश उघडे, आबासाहेब उघडे, ज्ञानदेव उघडे, अर्जून उघडे, अशोक लष्कर व इतर लहान सहान मुले जमा झाली होती. मी त्याठिकाणी जमा झालेल्या लोकांची नावे पोलीसांना सांगितली होती. माझ्या जबाबात पोलीसांनी सदर नावे लिहिलेली नाहीत याची कारणे मला सांगता येणार नाहीत.

६. पोलीस दि.२५/०८/२०२१ रोजी घटनास्थळावर सकाळी ११.०० – १२.०० च्या दरम्यान आले होते. पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी मी माझ्या पतीसोबत गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यावरुन आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**फेरतपास काही नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.04.10 17:18:26 +0530

(एस.एन.थापेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

दिनांकः १०/०४/२०२६.

सदर जबाब मी टंकलिखित केला.

(व्ही.जी.घोगरे)

लघुलेखक,